आपलं महानगर
mymahanagar.com mymahanagar mymahanagar mymahanagarnews
शनिवार, ११ डिसेंबर २०२१
मुंबई Metro

५६ वे मराठी विज्ञान अधिवेशन आजपासून जळगावमध्ये सुरू

◆मुंबई : मराठी विज्ञान परिषदेचे छपन्नावे मराठी विज्ञान अधिवेशन जळगाव येथे प्रत्यक्ष आणि ऑनलाईन पद्धतीने, ११ ते १३ डिसेंबर २०२१ दरम्यान होत आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षपद प्रा. समीर मित्रगोत्री (हार्वर्ड विद्यापीठ, अमेरिका) भूषविणार असून ते 'मधुमेह, कर्करोगांवरील नवीन उपचारपध्दती' याविषयी बोलतील. त्याशिवाय अन्नप्रक्रिया, महिला उद्योजक हे दोन परिसंवाद, केळी संशोधनावर व्याख्यान, डॉ. संजय ओक यांची मुलाखत, विद्यार्थ्यांसाठी प्रयोग इत्यादींचा प्रामुख्याने समावेश आहे. अधिवेशनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विज्ञानप्रेमींनी पुढील लिंक पाहावी. https://mavipa.org/events/adhive२१११/

महापौर किशोरी पेडणेकर यांना जीवे मारण्याच्या धमकीचे पत्र

◆प्रतिनिधी : मुंबई

मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. भाजप नेते आशिष शेलार यांच्यासोबतच्या वादानंतर महापौरांना धमकीचे पत्र मिळाले आहे. या पत्रात अश्लील भाषेचा वापर करत महापौर किशोरी पेडणेकर यांना शिवीगाळ करण्यात आली आहे. या पत्राबाबत महापौर किशोरी पेडणेकर यांनी एका मराठी वृत्तवाहिनीला ही माहिती दिली आहे. हे सांगताना महापौरांना अश्रू अनावर झाले.

महापौर किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, इतर पत्र येतात त्यात हे पत्र होते. हे पत्र माझ्या जुन्या घराच्या पत्त्यावर आले. याच पत्ताही थोडा चुकलेला आहे. या पत्रात अतिशय अश्लील भाषेचा वापर करण्यात आला आहे. स्त्रियांच्या प्रत्येक अंगाचा उल्लेख आहे. घरच्यांना मारुन टाकू, मुलाला मारून टाकू.. उडवून टाकू अशी भाषा वापरली आहे. पत्रात आतमध्ये एकाचे नाव आहे आणि बाहेर वेगळं नाव आहे. आणि पोस्ट हे पनवेलचे आहे. पोलिसांत तक्रार दिली आहे. कारण अशी हिंम्मत जर कोण करत असेल तर आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असेल तर माझ्या पक्षाचा अजेंडा असतो, मी शिवसेना पक्षाची आहे. त्यामुळे धमकावून घरी बसवणे, असे जर कोणाच्या मनात असेल तर ते होणार नाही. पण दखल घेतली पाहिजे. कारण माथेफिरुंची संख्या कमी नाही. यावर बोलताना महापौर पुढे म्हणाल्या की, आशिष शेलार आणि हा वाद वेगळा आहे. कोणत्या तरी पक्षाचा हा माथेफिरु असावा. कारण पत्रात कोण अशी घाण भाषा वापरु शकत नाही, लिहू शकत नाही, ती लिहिली गेली. कोणावरही संशय व्यक्त करु शकत नाही. पत्रात शिव्यांची लाखोली वाहिली आहे. स्त्रीच्या अंगाचे प्रदर्शन आहे. माझ्या दादाकडे बघितलं तर घरातल्यांना उडवून टाकेन, मुलाला मारुन टाकेन अशी भाषा वापरली आहे. कुटुंबाबद्दल लिहिल्याने मी थोडी धास्तावली. पोलीस सुरक्षा घेणार आहे.

यापूर्वी देखील महापौर किशोरी पेडणेकर यांनी धमकीचा कॉल आला होता. दरम्यान पोलिसांकडून या पत्राचा तपास सुरु आहे.

थोडक्यात

उन्नत मार्गाच्या बांधकामाला वर्षभरात होणार सुरुवात

◆मुंबई : चर्चगेट, कुलाबा, कफ परेड आणि नरिमन पॉइंट येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या नरिमन पॉइंट ते कफ परेड उन्नत मार्गाच्या बांधकामाला वर्षभरात सुरुवात होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मंगळवारी प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी निविदा जारी केली आहे. या निविदेनुसार लवकरच सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात येणार असून पुढे आराखडय़ाची आणि त्यानंतरची प्रक्रिया पूर्ण करून वर्षभरात प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. नरिमन पॉइंट ते कफ परेड उन्नत मार्ग प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी प्रस्तावाला दोन आठवडय़ापूर्वी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आता प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करण्यासाठी एमएमआरडीएने निविदा जारी केल्या आहेत.

गिरणी कामगारांना घरे मिळण्याबाबत अनिश्चितता

◆मुंबई : म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून गिरणी कामगारांसाठी काढण्यात आलेल्या २०१२ ते २०२१ पर्यंतच्या घरांच्या सोडतीतील काही विजेत्या कामगार, वारसांनी अद्याप कागदपत्रेच जमा केलेली नाहीत. आता या विजेत्यांना ३१ डिसेंबरपर्यंत कागदपत्रे जमा करण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत कागदपत्रे सादर न करणाऱ्या विजेत्या कामगार, वारसांना घराला मुकावे लागेल. कागदपत्रे सादर न करणाऱ्यांना अपात्र ठरवून प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांना संधी देण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार बंद गिरण्यांच्या जागेवर कामगारांसाठी मोफत घरे बांधून ती सोडतीद्वारे वितरित करण्याची जबाबदारी मुंबई मंडळावर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार म्हाडाने आतापर्यंत गिरण्यांच्या जमिनीवरील घरांसाठी तीन, तर एमएमआरडीएच्या भाडेतत्त्वावरील घरांसाठी एक अशा चार सोडती काढल्या.

एमएमएस प्रवेश परीक्षा अनिश्चित काळापर्यंत स्थगित

◆मुंबई : मुंबई विद्यापीठाच्या आयडॉल (दूर व मुक्त अध्ययन संस्था) विभागाने एमएमएस प्रवेश परीक्षा अनिश्चित काळापर्यंत स्थगित केली आहे. या अभ्यासक्रमासाठी इच्छुक असलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे. 'या अभ्यासक्रमांना प्रतिसाद वाढत असल्याने अन्य महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) तक्रार केली आहे. या प्रकारामुळे उर्वरित काही परवानग्या यूजीसीकडून थांबवल्याने ही स्थगिती देण्यात आल्याचे अधिसभा सदस्यांचे म्हणणे आहे.' विद्यापीठाच्या आयडॉल विभागाने एमएमएस, एमबीए आणि एमसीए अभ्यासक्रम सुरू करून त्यांच्या पूर्वपरीक्षांची घोषणा केली होती. त्यानुसार एमसीए प्रवेश प्रक्रिया पार पडली, मात्र एमएमएस अभ्यासक्रमाची परीक्षा तोंडावर आलेली असतानाच ती अनिश्चित काळापर्यंत स्थगित करण्यात आली.

मुंबई विद्यापीठात अनियमितता; उच्च शिक्षण मंत्र्यांची कबुली

◆मुंबई : मराठवाडा विद्यापीठातील गैरव्यवहारांचे प्रकरण गाजत असताना मुंबई विद्यापीठ, एसएनडीटीसह इतरही विद्यापीठांच्या कारभारात अनियमितता असल्याची कबुली खुद्द उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्र्यांनीच दिली आहे. विद्यापीठांचे लेखापरीक्षण करण्याची तसेच चौकशी समिती नियुक्त करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी कुलपती, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली आहे. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण सध्या गाजत आहे. त्याबाबत सामंत यांनी गुरुवारी कुलपतींची भेट घेतली. मराठवाडा विद्यापीठातील गैरव्यवहारांप्रमाणेच राज्यातील इतरही विद्यापीठांमध्ये अनियमितता असल्याची कबुली सामंत यांनी दिली आहे.

कोरियन भाषा शिकण्याकडे मुंबईतील तरुणाईचा कल

◆मुंबई : कोरियन वेब मालिकांसाठीचा भारतीय प्रेक्षकवर्ग गेल्या काही महिन्यांत वाढला असून त्यामुळे कोरियन भाषा शिकण्याकडेही भारतीय तरुणाई आकर्षित होत असल्याचे दिसते आहे. परदेशी भाषांच्या अध्यापनात भारतीय विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पसंती कोरियन भाषा शिकण्यासाठी दिल्याचे भाषा शिक्षण देणाऱ्या एका खासगी उपयोजनाने (ॲप) केलेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. जर्मन, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश, जपानी या भाषा शिकण्याकडे गेल्या अनेक दशकांपासून देशातील तरुणाईचा कल आहे. अलिकडील काही वर्षांत चिनी भाषा शिकण्यासाठीही प्रतिसाद वाढला आहे.

महापालिका २० लाख अँटिजेन चाचणी किट विकत घेणार

◆प्रतिनिधी : मुंबई

कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरियंट संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका अलर्ट झाली आहे. मुंबई महापालिकेने ओमायक्रॉनचा संसर्ग रोखण्यासाठी विविध प्रयत्न सुरु केले आहेत. त्यापैकी एक म्हणजेच कोरोना चाचण्या वाढवण्यात आल्या आहेत. मुंबई महापालिका रॅपिड अँटिजेन चाचण्यांचे २० लाख किट विकत घेणार असल्याची माहिती आहे. मुंबई महापालिकेला एक किट ९ रुपयांना मिळण्याची शक्यता आहे. तर, रॅपिड अँटिजेन टेस्टमुळे व्यक्तीला कोरोना संसर्ग झाला आहे की नाही याची माहिती अर्ध्या तासात मिळणार आहे.

दक्षिण आफ्रिका, युरोप या देशांमध्ये थैमान घालणाऱ्या ओमिक्रॉन वेरियंटचे आतापर्यंत केवळ दोन बाधित रुग्ण मुंबईत आढळून आले आहेत. तरीही खबरदारी म्हणून पालिकेने कोविड चाचण्यांचे प्रमाण वाढविले आहे. यासाठी २० लाख अँटीजन चाचण्यांचे कीट खरेदी केले जाणार आहे. विशेष म्हणजे केवळ नऊ रुपयांमध्ये ही चाचणी होऊन अर्ध्या तासांमध्ये अहवाल हातात पडणार आहे. याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने तयार केला असून लवकरच स्थायी समितीच्या पटलावर मंजुरीसाठी येणार आहे. मुंबईतील दररोज ३५ ते ४० हजार लोकांच्या चाचण्या करण्यात येत आहेत. यामध्ये सद्यस्थितीत सुमारे अडीशे बाधितांची नोंद होत आहे. पालिकेने अँटीजेन कीट खरेदी करण्यासाठी राबवलेल्या निविदा प्रक्रियेला पाच ठेकेदारांनी प्रतिसाद दिला आहे. किमान एका चाचणीसाठी नऊ रुपये दर ठेकेदाराने लावला आहे. स्पर्धा वाढल्याने कंपन्यांकडून कमी दर मिळाल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सोमवारपर्यंत कामावर या, अन्यथा...

अनिल परब यांचा एसटी कर्मचाऱ्यांना इशारा

◆प्रतिनिधी : मुंबई

एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. त्यामुळे एकूण दहा हजार कामगारांना निलंबित करण्यात आले आहे. मात्र, या कामगारांना एक संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारपर्यंत कर्मचारी कामावर आले तर त्यांचे निलंबन मागे घेतले जाईल, असं सांगतानाच सोमवारपर्यंत मेस्मा न लावण्याचा तूर्तास निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली.

परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी आणि एसटी प्रशासनातील अधिकाऱ्यांशी आज पुन्हा चर्चा केली. त्यानंतर त्यांनी मीडियाशी संवाद साधून ही माहिती दिली. आम्हाला कामावर यायचे आहे. पण काही लोक येऊ देत नाही असं काही कर्मचाऱ्यांचं म्हणणं आहे. कामगार कामावर यायला तयार आहेत. त्यामुळे त्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. जे कामगार सोमवारपर्यंत कामावर येतील त्यांचे निलंबन मागे घेऊ. जो डेपो ५० टक्के संख्येने सुरू होईल त्यांना तिथेच कामावर घेऊ. पण जिथे ही संख्या पूर्ण होत नाही. त्यांना बाजूच्या डेपोत सामावून घेतलं जाणार आहे. त्याबाबतचे लेखी आदेश काढणार आहोत, असे परब यांनी सांगितले.

आम्ही कारवाईबाबत पुढे गेलो आहोत. सोमवार नंतर कठोर कारवाई होऊ शकते. सोमवारी निलंबित कामगारांनीही कामावर यावं. निलंबित झालेले नाही अशा कामगारांनीही कामावर यावं. मला संधी दिली नाही असे वाटू नये म्हणून त्यांना एक संधी देत आहोत. कामगारांना अडवलं गेलं तर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार करावी किंवा डेपो मॅनेजरला सांगावं. जेणे करून त्यांना पोलीस संरक्षण पुरवले जाईल, असं सांगतानाच तूर्तास मेस्मा न लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, कामगार कामावर आले नाही तर त्याहूनही कठोर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

म्हाडाच्या परीक्षेबाबत अफवा, कुणालाही पैसे देऊ नका!

गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांचा इशारा

◆प्रतिनिधी : मुंबई

म्हाडाच्या परीक्षेबाबत अनेक अफवा पसरविल्या जात आहेत. काही लोक पैसे उकळण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे कोणत्याही अफवांना बळी पडू नका. कुणालाही पैसे देऊ नका. ही परीक्षा पारदर्शक पद्धतीने होणार आहे, असं सांगतानाच अफवा अशाच सुरू राहिल्या तर वेळ आल्यास मीच ही परीक्षा रद्द करेन, असा इशारा गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिला. यावेळी त्यांनी सर्व इच्छुक उमेदवारांना आवाहन करताना हातजोडून अफवांना बळी न पडण्याचं आवाहन केलं आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी एक व्हिडीओ ट्विट करून हे आवाहन केले आहे. १२ तारखेला होणाऱ्या परीक्षेबाबत अफवा पसरवल्या जात आहे. काही लोक पैसेही घेत आहेत, असे ऐकायला आले. असे जर कोणी रंगेहाथ पकडून दिले तर त्याची गंभीर दखल घेतली जाईल. पोलिसांमध्ये दिले जाईल आणि गुन्हे दाखल केले जातील. कृपया विद्यार्थ्यांना कुणालाही पैसे देऊ नका, असे आव्हाड यांनी सांगितलं.

म्हाडाची परीक्षा अत्यंत पारदर्शक पद्धतीने घेतली जाणार आहे. पास झालेल्यांचीही लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. त्यामुळे तुमचे दिलेले पैसे वाया जातील. मला नाशिक आणि आष्टीवरून फोन आला. आष्टीचा अधिकारी पैसे घेत असल्याचं सांगितलं जात आहे. अकोल्याहून फोन आले आहेत. या फसवणुकीला बळी पडू नका. या परीक्षेत कोणताही वशिला चालणार नाही. आमचा विभाग चालू देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोविडच्या पार्श्वभूमीवर रोजगार मिळावा म्हणून आम्ही ही पदे भरत आहोत. पण समाजातील काही गुन्हेगारी प्रवृतीची लोकं पैसे घेऊन काही करत असतील तर हातजोडून विनंती आहे त्यांच्या नादाला लागू नका. तुमचे पैसे बरबाद करू नका. नाही तर वेळ आली तर मी ही परीक्षाच रद्द करून टाकेन, असा इशारा त्यांनी दिला.

आरोग्य विभागाच्या पेपरफुटीबाबत आरोग्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांची मागणी

◆मुंबई : आरोग्य विभागाच्या परीक्षेचे पेपर फुटल्याने त्यावर भाजपने तीव्र संताप व्यक्त केला आहे. आरोग्य विभागातील क आणि ड वर्गाच्या परीक्षांच्या पेपरफुटी प्रकरणात खात्याच्या काही अधिकाऱ्यांचाच हात असल्याचे उघड होत आहे. त्याची जबाबदारी आता आरोग्य मंत्र्यांवर आली असून आता माफी मागून किंवा दिलगिरी व्यक्त करून भरून चालणार नाही. विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी राजेश टोपे यांनी आरोग्य मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली आहे.

केशव उपाध्ये यांनी मीडियाशी संवाद साधताना ही मागणी केली. तसेच आरोग्य विभागाच्या परीक्षेच्या पेपर फुटीप्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला. आरोग्य खात्यातील ६ हजारांहून अधिक जागांची भरती रखडवून ठाकरे सरकारने उमेदवारांना नैराश्यात ढकलले होते. वारंवार मागणी करूनही परीक्षांबाबत चालढकल करण्यात येत होती. वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या एजन्सीला परीक्षांचे कंत्राट देण्यासाठी त्यांच्या सोयीकरिता तब्बल २१ वेळा निविदेत बदल करण्यात आला. तेव्हाच ठाकरे सरकारचा हेतू स्पष्ट झाला होता, असे उपाध्ये म्हणाले.

परीक्षांच्या काही तास अगोदर काही उमेदवारांना व्हॉटसअप, टेलिग्रामवर प्रश्नपत्रिका मिळाल्या, अखेरच्या क्षणी वेळापत्रक बदलून परिश्रमपूर्वक तयारी करणाऱ्या उमेदवारांची फसवणूक करण्यात आली, तरीही आरोग्यमंत्री राजेश टोपे मात्र, एजन्सीची पाठराखण करून परीक्षा वेळेवर व पारदर्शक होण्याच्या बढाया मारत होते. पेपरफुटी ही अफवा नसल्याचं सिद्ध होऊनही आरोग्यमंत्र्यांनी वारंवार त्यावर मौन धारण केले, आणि आता या परीक्षेतील गैरव्यवहारांचे बिंग फुटल्यावर मात्र ते मूग गिळून गप्प बसले आहेत, असे उपाध्ये म्हणाले.

◆प्रतिनिधी : मुंबई

जामिनासाठी लागू केलेल्या अटी शिथिल करण्यासाठी आर्यन खान न्यायालयात

क्रूझ ड्रग्स प्रकरणात एनसीबीने अटक केलेल्या आरोपीपैकी बॉलिवूड स्टार शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान हा सध्या जामिनावर बाहेर आला आहे. मात्र न्यायालयाने आर्यनला जामीन देण्यापूर्वी काही अटी लागू करण्यात आलेल्या आहेत, त्यापैकी एक अट म्हणजे आठवड्याचा एक दिवस एनसीबी कार्यलयात हजेरी लावावी लागणार आहे. या अटींपैकी काही अटी शिथिल करण्यासाठी आर्यन खानने मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला असून या अर्जावर पुढील आठवड्यात सुनावणी होणार आहे.

क्रूझ ड्रग्स प्रकरणात अटक करण्यात आलेला बॉलिवूड स्टार शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खान याने २६ दिवस तुरुंगात काढल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. मात्र न्यायालयाने आर्यन खानला १४ अटी घातल्या होत्या त्यापैकी एक अट म्हणजे प्रत्येक शुक्रवारी आर्यनने एनसीबीच्या कार्यलयात हजेरी लावणे या अटी मान्य केल्यानंतर आर्यनला जामीन मंजूर करण्यात आला होता. ३० ऑक्टोबर रोजी आर्यन हा आर्थर तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर प्रत्येक आठवड्यात शुक्रवारी एनसीबी कार्यलयात हजेरी लावत आहे. दर आठवड्याला एनसीबीच्या कार्यलयात आल्यानंतर त्याला माध्यमाना समोरे जावे लागते. या सर्वातून सुटका होण्यासाठी अखेर आर्यनने जामीनावरील अटी शिथिल करण्यासाठी उच्च न्यायालयात शुक्रवारी अर्ज दाखल केला आहे. क्रूझ प्रकरणाचा तपास सध्या एनसीबीच्या दिल्ली पथकाकडे देण्यात आल्यामुळे शुक्रवारी एनसीबी मुंबई कार्यालयात हजेरी लावणाऱ्या आर्यन खान कडे कुठलीही चौकशी केली जात नाही, तसेच आर्यन ने तुरुंगातून बाहेर आल्यानंतर ६ आठवडे एनसीबी कार्यालयाला भेटी दिलेल्या आहेत. या अनुषंगाने न्यायालयाकडून आरत्यांच्या काही अटी शिथिल केल्या जाऊ शकतात. या अर्जावर उच्च न्यायालयात पुढच्या आठवड्यत सुनावणी होणार आहे.

मुंबईत लाल, पांढऱ्या रंगाचे झेब्रा क्रॉसिंग

◆प्रतिनिधी : मुंबई

रस्ता क्रॉस करताना आपण झेब्रा क्रॉसिंगचा रंग नेहमीच ब्लॉक आणि व्हाईट असल्याचे पाहत आलोय. मात्र हे रस्ता क्रॉसिंग करणे सहज आणि सुलभ व्हावे यासाठी मुंबई शहरात प्रथमच झेब्रा क्रॉसिंगचा रंग हा ब्लॉक अँड व्हाईट न ठेवता रेड आणि व्हाईट करण्यात येणार आहे. एमएमआरडीएने त्यांच्या कार्यालयाजवळील म्हणजे वांद्रेमधील रस्त्यांवर नव्या लाल आणि पांढऱ्या रंगाचे झेब्रा क्रॉसिंग तयार करण्यात आलेत. वाहन चालकांना आणि पादचाऱ्यांनाना लांबूनही झेब्रा क्रॉसिंगचे रंग नीट दिसावे यासाठी नाशिक, लखनौ, नागपूरसह अनेक शहरांमध्ये झेब्रा क्रॉसिंगचे हे रंग मोठ्या प्रमाणात वापरण्यात आले. इंडियन रोड क्रॉसिंग कलर कोड मार्गदर्शक तत्त्वांनुसार हे रंग ठरवले

जातात.

मुंबईत पूर्वीच्या डांबरी रस्त्यांची जागा आत्ता सिमेंटचा रस्ता सर्वाधिक आहेत. यात डांबरी रस्त्यांवर पांढरे आणि काळा रंग ठळक दिसतात. मात्र सिमेंटच्या रस्त्यांवर तेच रंग नीट दिसत नाहीत. यात अनेकदा हे रंग रहदारी आणि वाहतूकीमुळे फुसट होत आहेत. आयआरसीच्या नियमानुसार, सर्वाधिक गर्दीची ठिकाणे, वाहन पार्किंगमुळे रहदारी वाढलेली ठिकाणे किंवा कॉर्पोरेट भागांत वाहनांची संख्या आणि ये-जा जास्त असते. अशा ठिकाणी कलर कोड ३५ म्हणजेच लाल रंगाचा वापर करण्यस परवानगी असते.

वांद्रास्थित बीकेसी परिसर मुंबईतील सर्वात मोठा कॉर्पोरेट परिसर म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी विविध सरकारी, कार्यालये, बँकांची महत्त्वाची कार्यालये, तसेच इतर खाजगी कंपन्यांच्या कार्यालयांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे या परिसरातील रस्त्यांवर नेहमीच वाहनांची आणि पादचाऱ्यांची वर्दळ असते. अशा वेळी या ठिकाणी संबंधित भागातील रहदारीनुसार झेब्रा क्रॉसिंगला लाल रंग दिला जाऊ शकतो. गेल्या काही वर्षांत लाल रंगाचा वापर झेब्रा क्रॉसिंगवर वाढत आहे, अशी माहिती आयआरसीचे उपसंचालक (तांत्रिक) राहुल पाटील यांनी दिली आहे.

SBI
भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१
सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११०००५५ (इमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

अनु क्र.	फोलियो क्र.	धारकाचे नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक		विभिन्न क्रमांक	
				पासून	पर्यंत	पासून	पर्यंत
१	०७१०७६६४	ए गोपाला कृष्णन	६००	२३०२२८	२३०२२८	७४६०९८०४२१	७४६०९८१०२०
२	००८२०४२५	दीपक कुमार महापात्रा सुमिता महापात्रा	५३०	७०७४७	७०७४८	७३९०४३१९९१	७३९०४३२५२०
३	०२२४१५७०	ममता मालवीया मुकेश कुमार मालवीया	६००	१८४४२१	१८४४२१	७४३९३४५०९१	७४३९३४५६९०
४	०२२४१५७१	भारती मालवीया महेश कुमार मालवीया	६००	१८४४२२	१८४४२२	७४३९३४५६९१	७४३९३४६२९०
५	०२२४१२७१	महेश कुमार मालवीया भारती मालवीया	६००	१८४३६२	१८४३६२	७४३९३१४६३१	७४३९३१५२३०
६	०७५२५५१९	नौलम गांधी	९९६	६३२५६०६	६३२५६०६	८०६३७५८४६०	८०६३७५८६५५
७	०७५२६३६०	बिमला वर्मा संजय वर्मा	४२०	६३२६३७५	६३२६३७५	८०६४०२४२९९	८०६४०२४६३८
८	००८०१७९०	सोम नाथ चटर्जी मंदिरा चटर्जी	५३०	६२४१९	६२४१२	७३८८२९५९६१	७३८८२९६४९०
९	००९०२१९९	प्रताप चंद्र पांडा स्निग्धा रानी पांडा	६३०	१००२६०	१००२६१	७३९७६८४९८१	७३९७६८५६१०
१०	०१०१३०१८	श्रीकांत चंद्रकांत दीक्षित	१००	१०७३९१	१०७३९९	७३९९५०९२४१	७३९९५०९३४०
११	०२२४१५५८	राकेश कुमार अग्रवाल	६००	१८४४१४	१८४४१४	७४३९३४१३९१	७४३९३४१९९०
१२	०५१०४४९७	शीला देवी	६००	६७१४२	६७१४२	७३८९५२३४८१	७३८९५२४०८०
१३	०७५१२००९	कमलेश कुमार गुप्ता किरण गुप्ता	१४०	६३१२०६०	६३१२०६०	८०६०४४८५६०	८०६०४४८६९९
१४	०७११०४६६	ओम प्रकाश	८००	२३१४९६	२३१४९६	७४६१५१३२०१	७४६१५१३०००
१५	०१०१४४३८	ऑफ-शोर इंडिया लिमिटेड	३९०	१०७७५७	१०७७५८	७३९९६०२५४१	७३९९६०२८५०
१६	०१२१५१६०	ऑफशोर इंडिया लिमिटेड	५००	१२४२८९	१२४२८९	७४०८४८२९३१	७४०८४८२६३०
१७	०१०६६७२७	एन श्रेजावती डी आर नागराजा गुप्ता	५००	११३२६१	११३२६१	७४०२८९५१९१	७४०२८९५६९०
१८	०७५०९८३४	महेश कुमार	१४०	६३०९८९३	६३०९८९३	८०५९९८४८४५	८०५९९८४९८४
१९	०१६५८९७७	अशोक रानूलाल सुराणा श्रीमती शोभना अशोक सुराणा	६००	१४९२२९	१४९२२९	७४२९२७९४६१	७४२९२८००६०
२०	०१५४८४६२	लक्ष्मी पांडेय	५००	११९०२४	११९०२४	७४०५७९८३२१	७४०५७९८८२०
२१	०१५८८६७२	कावस पिरोजशॉ सुखेसुवाला शरनाज कावस सुखेसुवाला	६००	१४२४३६	१४२४३६	७४१७७८१७०१	७४१७७८२३००
२२	००८०३३६२	गिरिधर कुमार श्रीवास्तव श्रीधर कुमार श्रीवास्तव	६३०	६३२७६	६३२७७	७३८८५३१२४१	७३८८५३१८७०

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: ११.१२.२०२१

समभागांची संख्या: १०७२६
स.प्रमाणपत्रांची संख्या: २६

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)